# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## खंडणी /दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा,
## पिंपरी चिंचवड पथकाकडुन येरवडा मध्यवर्ती कारागृहातुन दरोडयाचे गुन्हयातील पलायन केलेल्या आरोपीस १२ तासात अटक.

दिनांक १३/०६/२०२० रोजी पहाटे ०५:४५ वाचे सुमारांस येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथुन पलायन केलेल्या दोन आरोपीताबाबत माहिती काढुन, त्यांचा शोध घेणेबाबत वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे खंडणी/दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुधीर अस्पत यांच्या अधिपत्याखाली पोलीस उप निरीक्षक श्री. अनिकेत हिवरकर, पोहवा २३ भोसले, पोहवा ३३८ खांडे, पोना ८७१ काटकर, पोना १०७२ लोखंडे व पोना १०७१ बोटके असे खाजगी वाहनाने येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथुन पलायन केलेल्या आरोपी बाबत माहिती घेवुन, शोध घेत असताना पोना आशिष बोटके व किरण काटकर यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, येरवडा मध्यवर्ती कारागृहातुन पळालेल्या आरोपीपैकी आरोपी अरशद सय्यद, रा. कासारवाडी, पुणे हा पवनामाई स्मशान भुमी, पिंपळे सौदागर, पुणे येथे कोणाची तरी वाट पाहत थांबलेला असुन, त्याने अंगात राखाडी रंगाचा टी शर्ट व काळया रंगाची जिन्स पॅन्ट असे कपडे घातलेल आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळालेवरून, पाहिजे आरोपी अरशद हनिफ सय्यद, वय २० वर्षे, रा. जामा मजिदचे मागे, सोनार चाळ, कासारवाडी, पुणे यास दिनांक १३/०६/२०२० रोजी १७:१५ वा ताब्यात घेवुन, त्याच्याकडे अधिक विचारपुस करता तो व त्याचा साथीदार नामे आकाश बाबुलाल पवार, रा. काळेवाडी, पिंपरी, पुणे असे दोघे मिळुन दिनांक १३/०६/२०२० रोजी पहाटे ०५:४० वा ते ०५:४५ वाचे दरम्यान येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथुन पळुन गेले असल्याने, त्याबाबत येरवडा पोलीस ठाणे गुरनं १८२६/२०२० भादवि कलम २२४, ३४ अन्वये गुन्हा नोंद असल्याची खात्री झाल्याने, त्यास दाखल गुन्हयात अटक करणेकामी येरवडा पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

आरोपी अरशद हनिफ सय्यद हा पोलीस रेकॉर्ड वरील गुन्हेगार असुन, त्याचे विरूध्द खालीलप्रमाणे गुन्हे नोंद आहे.

**१) खडकी पोलीस ठाणे गुरनं ३४२/२०१९ भादवि कलम ३९५**

**२) भोसरी पोलीस ठाणे गुरनं ३४१/२०१८ भादवि कलम ३७९**

**३) वाकड पोलीस ठाणे गुरनं ५९५/२०१८ भादवि कलम ३७९**

**४) येरवडा पोलीस ठाणे गुरनं ७८४/२०१९ भादवि कलम ३९२, ३९५** अन्वये गुन्हे नोंद आहेत.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त श्री. संदीप बिष्णोई सो, अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे सो, पोलीस उप आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ सो, सहा.पोलीस आयुक्त श्री आर.आर.पाटील सो, यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी/दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुधीर अस्पत, पोलीस उप निरीक्षक अनिकेत हिवरकर, तसेच पोलीस कर्मचारी अजय भोसले, महेश खांडे, अशोक दुधवणे, आशिष बोटके, किरण काटकरण, नितिन लोखंडे व विक्रांत गायकवाड यांचे पथकाने केली आहे.

(सुधीर अस्पत)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खंडणी/दरोडा विरोधी पथक,
गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड